सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे- ४११००७

Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल/Email :boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Unit)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in

परिपत्रक क्र. २३९ / २०२६

विषय:— स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालये/परिसंस्थांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने पारित केलेले विनियम/महाराष्ट्र शासनाने विहीत केलेले एकरूप परिनियम/महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशातील तरतूदी तसेच परिपत्रक क्र. २७/२०२३ व परिपत्रक क्र. १२९/२०२३ मध्ये विहित केल्याप्रमाणे मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करणेबाबत....

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांस या परिपत्रकाद्वारे पुन:श्च कळविण्यात येते की, स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालये/परिसंस्था यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने पारित केलेले विनियम व महाराष्ट्र शासनाने विहीत केलेले एकरूप परिनियम यामधील तरतुदी (पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांबाबत, अध्यापनाचे तास, अभ्यासक्रमाचा आशय–विषय आणि गुणवत्ता, भौतिक सुविधा/आवश्यक मानव संसाधन, प्रवेश, शूल्क निश्चिती, शिष्यवृत्ती, पी.आर.एन. नंबर, शैक्षणिक पात्रता इ. बाबत) तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशातील तरतूदी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परिनियम व अध्यादेशातील तरतूदी तसेच परिपत्रक क्र. २७/२०२३, संदर्भ क्र. सी.ए./१८६, दि. ०६/०२/२०२३ व परिपत्रक क्र. १२९/२०२३, संदर्भ क्र. सी.बी.एस./५८५, ३०/०६/२०२३ मध्ये विहित केल्याप्रमाणे सर्व नियमांची व प्रक्रियेची पूर्तता करावी.

तसेच परिपत्रक क्र. २७/२०२३, संदर्भ क्र. सी.ए./१८६, दि. ०६/०२/२०२३ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे त्या–त्या कॅलेंडर वर्षाच्या दि. ३१ मार्च पर्यंत अभ्यासक्रमांचा मसुदा विहित प्रक्रियेद्वारे स्वायत्त महाविद्यालयांच्या सर्व अधिकार मंडळांमार्फत मंजुरीची रितसर प्रक्रिया करून आवश्यक माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर BOD Online – Login (College Username & Password) – Autonomous Courses (Revised/New) या शीर्षकाखाली प्रस्तुत करावी.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून ज्या महाविद्यालयांना संबंधित कॅलेंडर वर्षाच्या दि. ३१ मार्च नंतर स्वायत्त दर्जा प्राप्त झाला असेल अशा महाविद्यालयांनी त्या शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असलेली प्रशासकीय व शैक्षणिक कार्यवाही जसे की, मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने मा. विद्यापरिषदेवर तीन सदस्यांचे, प्रत्येक अभ्यासमंडळ व नियामक मंडळावर एक सदस्याचे नामनिर्देशन करणे इ. बाबी पूर्ण करणे आवश्यक असते. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उक्त अधिकार मंडळांच्या सभांचे आयोजन करून त्यांची मान्यता घेऊन संबंधित महाविद्यालयास त्या शैक्षणिक वर्षाकरिता सर्व अभ्यासक्रमांचा संपूर्ण आराखडा व तपशिलवार अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक असते. तसेच, नवीन पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करावयाचे असल्यास, त्यासाठी विद्यापीठाच्या संबंधित अधिकार मंडळाची मान्यता घेणे आवश्यक असते.

उक्त अभ्यासक्रम काळजीपूर्वक व व्यवस्थित रीतीने तयार न केला गेल्यास त्याचा शैक्षणिक दर्जावर परिणाम होण्याची शक्यता असते. तसेच प्रशासन व्यवस्थेवरही अधिकचा ताण येतो. त्यामुळे दि. ३१ मार्च नंतर स्वायत्तता प्राप्त झालेल्या महाविद्यालयांनी त्याच्या पुढील वर्षीच्या दि. ३१ मार्च पर्यंत स्वायत्त अभ्यासक्रम व इतर माहिती उपरोक्त उल्लेखित BOD Online शीर्षकाखाली प्रस्तुत करावी. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या अभ्यासक्रमांना त्या कॅलेंडर वर्षात कोणत्याही परिस्थितीत मान्यता दिली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित स्वायत्त महाविद्यालये/सर्व संबंधित मान्यता प्राप्त परिसंस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

30/10/2026

गणेशखिंड, पुणे — ४११००७)
जावक क्र. सीबीएस/२८९)
दिनांक : ३० / १० /२०२६)

(स. द. डाकखर)
उपकुलसचिव

प्रत माहितीसाठी:

१. मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र—कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:—

१. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. प्राचार्य, सर्व संबंधित स्वायत्त महाविद्यालये
४. मा. संचालक, सर्व संबंधित मान्यता प्राप्त परिसंस्था
५. मा. संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
९. मा. सहायक कुलसचिव, अहिल्यानगर व नाशिक विद्यापीठ उपकेंद्र
१०. मा. संचालक, माहिती तंत्रज्ञान सेवा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

संदर्भ : परिपत्रक क्र. २७/२०२३, संदर्भ क्र. सी.ए./१८६, दि. ०६/०२/२०२३व
परिपत्रक क्र. १२९/२०२३, संदर्भ क्र. सी.बी.एस./५८५, ३०/०६/२०२३